# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 08/03/2023 (बुधवार) सकाळ

## चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील वडंली वाघ शिवार येथे दिनांक ०५/३/२०२३ चे १७.३० वा. ते दिनांक ०६/३/२०२३ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— धनराज नत्थुजी रेवतकर, वय ७६ वर्ष, रा. तार बाजार काटोल यांच्या वडंली वाघ शेत शिवारातुन घटना तारीख वेळी व ठिकाणी शेतातील घराच्या दरवाज्याचा कोंडा तुटलेला दिसला दरवाजा उघडून पाहिले असता, कापुस अंदाजे २५ गट्ठे अंदाजे ५ क्वींटल असा एकुण किंमती अंदाजे ३००००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करून चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ३९८ भुषण मदनकर पोलीस स्टेशन काटोल हे करीत आहे.

## दुखापत

१) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील सील्लेवाडा कॉलनी येथे दिनांक ०७/०३/२०२३ चे १४. ३० वा. सुमारास फिर्यादी नामे— चेतन बाला रामटेके, वय ३० वर्ष रा. सिल्लेवाडा कॉलोनी क्वार्टर नंबर १०७ व आरोपी नामे— परसा सहारे रा. सिल्लेवाडा कॉलनी हे एकाच कॉलनीत एकमेकांच्या क्वार्टरचे शेजारी राहत असून नमूद घटना वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने फिर्यादीला म्हटले की ''तू कुत्रीला धाब्यावर जाऊ का देत नाही'' या कारणावरून झगडा भांडण करून शिवीगाळ केली व ''तुम्ही इथून निघून जा तुमचे घर जाळून टाकीन'' अशी धमकी दिली व हातात दगड घेऊन फिर्यादीचे डोक्याला मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल लोहकरे ब. नं. १६७३ मो. नं. ८६६८८३३४७७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :- अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील वार्ड क्र. २ तेलकामठी ता. कळमेश्वर येथे दिनांक ०७/०३/२०२३ चे १२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे- नंदकिशोर गुणाजी डांगे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र. २ तेलकामठी ता. कळमेश्वर व आरोपी नामे- १) अशोक गुणाजी डांगे २) सौ. सुनिता अशोक डांगे ३) आदर्श अशोक डांगे रा. तिन्ही वार्ड क्र २ तेलकामठी ता. कळमेश्वर हे एकाच घरात वेगवेगळया माळयावर राहत असून यातील फिर्यादी व आरोपी याचे घरगुती कारणावरुन जुना वादविवाद असल्याने फिर्यादीची लहान मुलगी आरोपी भावाचे घरी खालच्या माळयावर गेल्याने फिर्यादीने तिला कशाला गेली होती म्हणुन हटकले असता त्यावरुन आरोपीतांनी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी सोबत वादविवाद करुन शिवीगाळ केली व पाहुन घेण्याची धमकी दिली व आरोपी पुतण्याने खाली जमीनीवर पाडल्यावरुन फिर्यादीचे उजव्या डोळयाजवळ मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राठोड ब. नं. ७४२ मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**